जनसंपर्क कक्ष

31 JAN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साधन व्यक्ती म्हणून ककडेंची निवड

## राष्ट्रीय प्रतिभूती, बाजार संस्थेमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख व भगवान महावीर अध्यासनचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांची राष्ट्रीय प्रतिभूती व बाजार संस्थेमार्फत कोना कोना शिक्षा या वित्तीय प्रशिक्षणासाठी साधन व्यक्ती म्हणून निवड झाली.

या अंतर्गत पदवीच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना दहा तासांची कार्यशाळा मोफत घेतली जाणार आहे. त्यामध्ये बचत, गुंतवणूक, नवी तंत्रे व सावधानता याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. परिणामी या विद्यार्थ्यांना वित्तीय क्षेत्रात करिअर करता येणार आहे.

डॉ. विजय ककडे हे सेबीचे अर्थसाक्षरता साधन व्यक्ती म्हणून गेली १२ वर्षे काम करत आहेत. त्यांनी ६०० हून अधिक व्याख्याने अर्थसाक्षरतेबाबत दिली आहेत. त्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे , वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी अभिनंदन केले.



साधन व्यक्ती म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ. विजय ककडे यांचे डॉ. शिर्के यांनी अभिनंदन केले.

तरूण भारत

थोडक्यात महत्त्वाचे



कोल्हापूर : डॉ. विजय ककडे यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# वित्तीय प्रशिक्षणासाठी साधन व्यक्ती म्हणून डॉ. ककडे यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख व भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांची राष्ट्रीय प्रतिभूती व बाजार संस्थेमार्फत कोना कोना शिक्षा या वित्तीय प्रशिक्षणासाठी साधन व्यक्ती म्हणून निवड झाली आहे. या अंतर्गत पदवीच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना १० तासांची कार्यशाळा मोफत घेतली जाणार आहे. या कार्यशाळेत बचत, गुंतवणूक, नवीन तंत्रे, व सावधानता याविषयी प्रशिक्षण दिले जाणार आहे. परिणामी विद्यार्थ्यांना वित्तीय क्षेत्रात स्वत: चे करियर करता येणार आहे. डॉ. ककडे हे एसईबीआयचे अर्थसाक्षरता साधनव्यक्ती म्हणून गेली १२ वर्षे काम करत आहेत. त्यांनी ६०० हून अधिक व्याख्याने अर्थसाक्षरतेबाबत घेतली आहेत. या निवडीबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी डॉ. ककडे यांचे अभिनंदन केले.

सकाळ

# विजय ककडे यांची 'सेबी'तर्फे निवड



डॉ. विजय ककडे

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. विजय ककडे यांची राष्ट्रीय प्रतिभूती व बाजार संस्थेतर्फे (सेबी) 'कोना-कोना शिक्षा' या वित्तीय प्रशिक्षणासाठी साधन व्यक्ती म्हणून निवड झाली आहे. या अंतर्गत पदवीच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दहा तासांची कार्यशाळा मोफत घेतली जाणार आहे. त्यामध्ये त्यांना बचत, गुंतवणूक, नवीन तंत्रे व सावधानता याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. भगवान महावीर अध्यासनाच्या समन्वयकपदी ते कार्यरत आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# प्रा. डॉ. विजय ककडे यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख व भगवान महावीर अध्यासन प्रा. डॉ. विजय ककडे यांची राष्ट्रीय प्रतिभूती व बाजार संस्थामार्फत कोना कोना शिक्षा या वित्तीय प्रशिक्षणासाठी साधन व्यक्ती म्हणून निवड झाली आहे. याअंतर्गत पदवीच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना १० तासांची कार्यशाळा मोफत घेतली जाणार आहे. या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
31 JAN 2023 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. पंकज पोतदार, डॉ. टी. डी. डोंगळे, शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य.

# शाश्वत समाज निर्माण करण्याचा प्रयत्न

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नवसंशोधकांनी ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामान बदलासंदर्भात संशोधन करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरोग्यदायी शाश्वत समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्रांतर्फे स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले. पुणे राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे डॉ. पंकज पोतदार, स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**■ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन**

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे डॉ. पंकज पोतदार म्हणाले, स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमातून जास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करा. जेणेकरून भविष्यात संशोधन करण्यास त्याचा फायदा होईल. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य म्हणाले, डीएसटीच्या विविध योजना आहेत. स्तुती कार्यक्रमांतर्गत उपकरणांचा पुरेपूर वापर करा. शिवाजी विद्यापीठीतल स्तुती समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी चांगली कामगिरी केली आहे. तसेच विद्यापीठातील स्तुति टीमचेही कौतुक केले.

स्तुती समन्वयक डॉ. सोनकवडे म्हणाले, देशभरातील विद्यापीठांमध्ये २२ कार्यक्रम केले आहेत. शिवाजी विद्यापीठातील हा चौथा कार्यक्रम आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सातारा, हरियाणा, मुंबई, गुजरात, पुणे, औरंगाबाद, सोलापूर, कराड, वडोदरा, गोवा इत्यादी ठिकाणाहून २१२ पेक्षा अधिक नोंदणी झाली. सात दिवस दिल्ली, पुणे, अमरावती, बेंगलोर आदी शहरातून १४ तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. सहभागींसाठी अभ्यास सहलीचे आयोजन केले आहे. पदार्थविज्ञानशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांनी 'एक्स रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्टरोस्कोप' या अत्याधुनिक उपकरणाविषयी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात सहभागींना आधुनिक उपकरणांची प्रात्यक्षिके दाखवली. तसेच संशोधकांच्या सॅम्पलची तपासणी केली. सत्यशीला धोंगडे यांनी सूत्रसंचालन केले. स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

लोकमत

# परीक्षांत गैरप्रकारप्रकरणी १८ विद्यार्थ्यांवर कारवाई

## भरारी पथक : परीक्षा सुरळीत पडल्या पार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील २७ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. यात कोल्हापूरसह सांगली, सातारा या कार्यक्षेत्रांतील परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली होती. या पथकाने सोमवारी परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या १८ विद्यार्थ्यांवर कारवाई केली.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये बी. एस्सी, बी. कॉम., बी. टेक, बी. फार्मा, आदी २७ अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २ जानेवारीपासून सुरू होत्या. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली होती. या पथकाने सोमवारी सांगली, सातारा, कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांतून एकूण १८ विद्यार्थ्यांची परीक्षेतील गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद केली.

या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनेनुसार परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रांतर्गत पदवी, पदव्युतरच्या २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ जानेवारीपासून व्यवस्थितपणे सुरू झाल्या आहेत. सोमवारी बी.कॉम., बीएस्सी., बी.टेक., बी.फार्मसी., बीएस्सी (संगणकशास्त्र), बॅचलर ऑफ आर्टस्, बी.कॉम (बँक मॅनेजमेंट), बीएस्सी. (फूड टेक्नॉलॉजी), बीएस्सी (ॲनिमेशन), बॅचलर ऑफ लॉ, बी.व्होक, बीआयडी आदी २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्नित महाविद्यालये, अधिविभागामध्ये झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात ७ रोजी सूत्रसंचालन, इव्हेंट मॅनेजमेंट विषयांवर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातून

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते ५ यावेळेत एकदिवसीय मोफत कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत सूत्रसंचालन शास्त्राची ओळख, सूत्रसंचालनाचे महत्त्व, विविध कार्यक्रमातील सूत्रसंचालन, इव्हेंट मॅनेजमेंट, करिअर संधी विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

सकाळ

# विद्यापीठात कौशल्य कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे ७ फेब्रुवारीला मोफत कौशल्य कार्यशाळा आयोजित केली आहे. सकाळी अकरा ते सायंकाळी पाच या वेळेत कार्यशाळा होईल, अशी माहिती या विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी दिली.